या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार १७ जून २०२४ | अंक१९० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी
नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई
वडवणी केज परळी
पाटोदा शिरूर कासार
धारूर आष्टी माजलगाव
इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

# संपूर्ण राज्यात आज यलो अलर्ट, मराठवाडा, विदर्भात पावसाला सुरुवात २० जूननंतर मान्सूनचा जोर वाढणार

## मराठवाडा, विदर्भात पाऊस

वाशिम जिल्ह्यात काही ठिकाणी रविवारी रात्री वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात जोरदार पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे पेरणी झालेल्या हळद, कपाशी या पिकांना चांगला आधार मिळाला आहे. पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये आंनदाचे वातावरण निर्माण झाले आहे. वाशिम जिल्ह्यातील पाणी प्रकल्पात पाणी साठवण्यासाठी आणखी दमदार पावसाची गरज आहे. परभणी शहरासह जिल्ह्यात सर्वदूर पाऊस पडला. रविवारी रात्री साडे अकराच्या सुमारास जोरदार पाऊस सुरू झाला. जोरदार पावसाने शेती कामांना वेग येणार आहे. नांदेडमध्ये पावसाला सुरुवात झाली आहे. परंतु पेरणीसाठी शेतकऱ्याला मोठ्या पावसाची प्रतीक्षा आहे.

## अनेक जिल्ह्यांमध्ये मध्यम ते मुसळधार स्वरुपाच्या पावसाची शक्यता



महाराष्ट्रात वेळाआधी दाखल झालेला मान्सून विदर्भात प्रवेश करण्यापूर्वी रेंगाळला होता. परंतु आजपासून पुन्हा मान्सून सक्रीय झाला आहे. विदर्भ अन् मराठवाड्यातील काही भागांत पावसाला सुरुवात झाली आहे. दुसरीकडे मुंबई हवामान विभागाने संपूर्ण राज्यात आज यलो अलर्ट दिला आहे. राज्यात सर्वत्र मान्सून पोहचला आहे. मुंबई, पुणे शहरात सोमवारी सकाळापासून पावसाचे वातावरण निर्माण झाले आहे. हवामान विभागाने कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये मध्यम ते मुसळधार स्वरुपाच्या पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. नांदेड जिल्ह्यात केवळ 35 मिलीमीटर पावसाची आतापर्यंत नोंद झाली आहे. औंढानागनाथ तालुक्यात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे त्या भागात खरीपाच्या पेरणीला वेग आला आहे. सोयाबीन, मूंग, उडीदसह कापसाची लावगड करण्यात शेतकरी व्यस्त आहेत.मुंबईत धरणांमध्ये 22.5 %पाणीसाठा मुंबईला पाणी पुरवठा कारणाऱ्या भातसा धारणमध्ये अवघा 22.5 % पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. शहापुरतील धरण क्षेत्रात पावसाने दडी मारली आहे. धारण क्षेत्रात पाऊस न झाल्याने पाणी पाणीसाठा कमी झाला आहे. या भागात 10 ते 12 दिवस पाऊस झाला नाही तर मुंबईकारांवर पाणीसंकट ओढवू शकतो. राज्यात 20 जूननंतर पावसाचा जोर वाढणार राज्यात पावसाने विश्रांती घेतली होती. परंतु आता पाऊस सक्रीय होऊ लागला आहे. 20 जूननंतर राज्यात मान्सूनचा जोर वाढणार आहे.

## आज श्री क्षेत्र चाकरवाडी येथे प्रेममुर्ती महंत शिवाजी महाराज नारायणगड कर यांचे कीर्तन..



बीड प्रतिनिधी - विसाव्या शतकातील महान संत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या २४ व्या पुण्यतिथी उत्सवात आज दि १७ वार सोमवार रोजी रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत चतुर्थ दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प महंत शिवाजी महाराज नारायणगड कर यांचे होणार आहे. तरी या कीर्तनाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा. असे आवाहन बाळनाथ माऊली संस्थांनचे तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य ह भ प महादेव महाराज तात्या, नारायण महाराज भाऊ तसेच श्री क्षेत्र चाकरवाडी कर ग्रामस्थांच्या आणि माऊली भक्तांच्या वतीने करण्यात आले

## पंकजाताई मुंडेचा पराभव जिव्हारी लागल्याने एकाची गळफास घेऊन आत्महत्या वारणी गावांत ३५ वर्षीय तरूणाने संपले जिवन !





अरे बाबांनो आत्महत्या सारखा प्रकार करू नका अशा प्रकारे खचुन जावून आत्महत्तेसारखा मार्ग कुणीही धरू नका असे आवाहन माजी पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी केले.या घटनेमुळे संपुर्ण वारणी गावावर शोककळा पसरली आहे.

**शिरूर कासार/प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यातील वारणी गावातील एका पस्तीस वर्षीय तरूणाने लोकसभेच्या निवडणूकितील पंकजाताई मुंडे यांचा पराभव जिव्हारी लागल्याने नैराशेपोटी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली . याबाबत सविस्तर माहिती अशी की मा.पालकमंत्री पंकजाताई मुंडे ह्या लोकसभेच्या उमेदवार होत्या मात्र त्यांचा अल्पमतानी पराभव झाला , या पराभवातून आलेल्या नैराशेपोटी गणेश उर्फ (हरिभाऊ ) भाऊसाहेब बडे या तरुणाने रविवारी दुपारी अडीचच्या सुमारास चिंचवन नावाच्या शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली . घटनास्थळी स.पो.नि भाऊसाहेब शिरसाट यांनी जाऊन पंचनामा केल्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र शिरूर कासार येथे शवविच्छेदन झाल्यानंतर अंत्यविधी करण्यात आला आकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील तपास स.पो.नी यांचे मागणीखाली पो उप निरीक्षक भाऊसाहेब शिरसाट हे करत आहेत . मयत गणेश बडेच्या पश्चात आई वडील पत्नी दोन लहान मुली एक लहान भाऊ असा परिवार आहे .पंकजाताई मुंडे ,आ.सुरेश धस यांनी अंत्यविधीला उपस्थित राहून कुटूंबियाचे सांत्वन केले .

## नांदगाव शाळेत प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे स्वागत नवव्या वर्गाचे उद्घाटन

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**



नांदेड : लोहा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांदगाव केंद्र मारतळा येथील शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेत प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.व इयत्ता नवव्या वर्गाचे उद्घाटन ही करण्यात आले. तालुक्यातील नांदगाव/चिंचोली येथे शाळेच्या पहिल्या दिवशी इयत्ता पहिली प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.तसेच प्राथमिक शाळा नांदगाव येथे नव्याने मान्यता मिळालेल्या नवव्या वर्गाचे उद्घाटन शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती अंजली कापसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्र प्रमुख श्री.पानपट्टे ,मुख्याध्यापक एम.डी. सिरसाट बी.आर. पाटील यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.__

## कोल्हेरच्या चैतन्य पवार याचे नीट परीक्षेत घवघवीत यश ; 720 पैकी मिळवले 696 गुण



गेवराई/प्रतिनिधी तालुक्यातील कोल्हेर येथील शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी चैतन्य भगीरथ पवार याने नुकत्याच झालेल्या नीट परीक्षेत ७२० पैकी ६९६ गुण घेत घवघवीत यश संपादन केले आहे. चैतन्य याचे प्राथमिक शिक्षण कोल्हेर येथे झाले यानंतर माध्यमिक शिक्षण अंबेजोगाई येथे झाले असून १० वी नंतर त्याने अंबेजोगाई येथील खाजगी शिकवणीत शिक्षण घेत नीट परीक्षेत ७२० पैकी ६९६ गुण घेत घवघवीत यश संपादन केले. या यशाबद्दल त्याचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. एमबीबीएस या कोर्ससाठी तो पात्र ठरल्याने त्यास पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्व शिक्षक, नातेवाईक व ग्रामस्थांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## एक लोकनेता आणि कार्यकर्ता यांच्यातील भाव भरपूर कांही सांगुन जातो. कांही वेळेला शब्द देखील शोधावे लागतात. मात्र सापडत नाहीत









कविता

## बाप हा बापच असतो

माझा काय , तुमचा काय
ह्याचा काय आन् त्याचा काय
सर्वांना मी एकच सांगतो
बाप हा बापच असतो !!धृ!!

स्वत: करतो काम
स्वत: कमावतो दाम
लेकराबाळासाठीच तो
काढीत असतो घाम
का आन् कुणास ठाऊक
सर्वांनाच तो वाईट असतो!!१!!

सर्वांना मी एकच सांगतो
बाप हा बापच असतो

कुणाच्या जिवावर सांगा
करता तुम्ही हिंमत
जन्मदात्या बापालाच का?
देत नाहीत किंमत
चुका केल्या तुम्ही कितीही
तोच माफ करीत असतो!!२!!

सर्वांना मी एकच सांगतो
बाप हा बापच असतो

तुमच्याच शिक्षणापायी
कर्जबाजारी होत असतो
बहिणीच्या लग्नासाठी
सावकाराचा पाय धरतो
लेक जाता सासरी
काळजातून रडत असतो!!३!!

सर्वांना मी एकच सांगतो
बाप हा बापच असतो

©®ग्रामीण कवी श्रीराम घडे
परभणी
मो 8806042660

# कौठा दरोडा प्रकरणी ४८ तासात दरोडेखोरांना अटक करा

## अन्यथा महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा

### कंधार पोलीस अधिकाऱ्यांना दिले निवेदन



**कंधार प्रतिनिधी**

कंधार तालुक्यातील कौठा येथील कृषी व्यापारी गजानन येरावार यांच्या घरावर पडलेल्या धाडसी दरोड्यात लाखो रुपयाचा ऐवज दरोडेखोरांनी पळविला. या घटनेनंतर सदरील व्यापारी व जिल्ह्यातील सर्व समाज बांधव भयभीत झाले आहेत. या संदर्भात महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा व आर्य वैश्य समाजाच्या असंख्य बांधवांनी रविवारी दिनांक 16 जून रोजी येरावार यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना धीर दिला. या संदर्भात दरोडेखोरांना 48 तासात अटक करावी. अन्यथा महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या वतीने संपूर्ण राज्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. कंधार येथील पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांना या संदर्भातील निवेदन देण्यात आले असून जिल्हा पोलीस अधीक्षक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना या संदर्भात भ्रमणध्वनी वरून संपर्क साधून या प्रकरणाचा छडा लावावा असे विनंती करण्यात आली आहे. या घटनेच्या निषेधार्थ रविवारी संपूर्ण कौठा गाव बंद पुकारून निषेध करण्यात आला या संदर्भात शनिवारी सायंकाळी महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या हाकेला जिल्हा व राज्यातील असंख्य समाज बांधव रविवारी सकाळी कौठा येथे जाऊन घटनास्थळाची पाहणी केली. पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन दिले. 48 तासात आरोपीला अटक झाली नाही. तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे या प्रसंगी महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे राज्य संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार, राज्य प्रसिद्धीप्रमुख नरेंद्र येरावार, राज्य कार्यकारणी सहसचिव सदानंद मेडेवार, ग्रामीण जिल्हाध्यक्ष विजय कुंचनवार, राज्य उपाध्यक्ष नंदकुमार मडगुलवार, उत्तम चौधरी, राम पत्तेवार, पवन गादेवार, अशोक मामीडवार, नरसिंग मुक्कावार ,अनिल नगनूरवार, साईनाथ मेडेवार, विजय महाजन, अनिल वट्टमवार, विक्रम गोविंदवार, पंडित वट्टमवार, तुकाराम तगडपल्लेवार, ज्ञानेश्वर कोत्तावार, सरपंच शिवराज देशमुख, सुभाष उपलंचवार, भानुदास येरावार, सतीश देशमुख, राजेश पावडे, भुजंग बिडवई, शंकर वट्टमवार, किशन कंधारे, रुपेश येरावार, प्रताप देशमुख, साईनाथ महाजन, महेश तांडूरवार, लक्ष्मण गंगावार, चंद्रकांत पाळेकर, अक्षय जवाद्वार, विशाल पापीनवार, धनंजय कवटिकवार, बालाजी पालीमकर, नागेश बोरलेपवार, अनिल सिरमवार, स्वप्निल बासटवार, विशाल नारलावार, सागर मुखेडकर, संदीप बंडेवार, चंद्रकांत पाळेकर अक्षय जवाद्वार संतोष जकाळपुरे, संदीप बंदेवार,प्रा.अनिल मुगटकर यांच्यासह आर्य वैश्य समाजातील असंख्य बांधव गावातील प्रतिष्ठित नागरिक व्यापारी उपस्थित होते.

# योग्य वेळी योग्य निर्णय घेवू-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

## भावनेच्या आहारी जाऊ नका, पुढच्या प्रवासाला साथ द्या

**बीड /प्रतिनिधी** सध्याच्या सुरू असलेल्या एकंदरीत राजकीय परिस्थितीचा आढावा घेवून आणि तुमच्या सर्वांच्या भावना लक्षात घेवून योग्य वेळी योग्य निर्णय घेवू असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



आशिर्वाद मंगल कार्यालयात आयोजीत करण्यात आलेल्या भव्य कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर रविंद्र क्षीरसागर, सौ.प्रियाताई महिंद्रे, ह.भ.प.नाना महाराज ढेकणमोहाकर, जगदिश काळे, माधवराव मोराळे, विलास बडगे, गंगाधर घुमरे, तानाजी कदम, दिनकर कदम, बाबुसेठ लोढा, अशोकराव होके पाटील, सहाल चाऊस, अरूण डाके, वचिष्ठ नवले, रोहित क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर, शरद ढाकणे, गणपत डोईफोडे, अजिंक्य चांदणे, सुधाकर मिसाळ, मुखीद लाला, ॲड.सय्यद खाजा, नरसिंह नाईकवाडे, सनी वाघमारे, विलास विधाते, राणा चौव्हाण, दिलीप आहेर, उषाताई सरवदे, सुभाष क्षीरसागर, सुभाष बनसोडे, सखाराम मस्के, सुधाकर जाधव, अरूण बोंगाणे, विठ्ठल बहीर, सुलेमान पठाण, जमील भाई, राजेंद्र काळे, शेषेराव फावडे, धनंजय जगताप, शिवाजीराव जाधव, सचिन घोडके, भगवान गवते, अर्जून नलवडे, सिध्देश्वर आर्सुळ, विष्णु जाधव यांची उपस्थिती होती.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्व.काकू-नाना यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिनकर कदम यांनी केले तर तानाजी कदम, उषाताई सरवदे, सुधाकर मिसाळ, बाबूसेठ लोढा, अजिंक्य चांदणे, गंगाधर घुमरे आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलतांना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, यावर्षी निसर्गानेच कृपा केली आहे, वेळेवर मृगाचा पाऊस पडल्यामुळे आपला शेतकरी बांधव शेतीच्या कामाला लागला आहे. आज सर्वांचा मनापासून आशिर्वाद मिळावा यासाठीच हा मेळावा आयोजीत करण्यात आला आहे. व्यासपीठासह समोर असलेल्या हजारोंचा माझा परिवार आहे. कुटूंबाशी आणि प्रत्येकाशी संवाद साधावा म्हणूनच हा कार्यक्रम घेतला आहे. कधी नव्हे ते निसर्गानेही साथ दिली आहे. वेळेवर सर्व कामे होवू लागली आहेत. लोकशाहीत जय-पराजय असतोच पराभवाने खचून जायचे नाही आणि यशाने हुरळून जायचं नाही. हा विचार आम्ही करतो. माझा एक-एक कार्यकर्ता हजार मताचा मालक आहे. हा अनुभव आजचा नाही, पराभवाच्या आणि संकटाच्या काळात हा कार्यकर्ता सोबत राहिला आहे. अपयश आले तर खचून न जाता आपण कुठे कमी पडलो यावर फोकस करून आम्ही पुन्हा नव्या उमेदीने पुढे जात असतो. संकट काळात लोकांच्या मदतीला जाणे हा आमचा पिंड आहे. बीड जिल्ह्यात निसर्गाने अनेकवेळा पाठ फिरवली. बीड जिल्ह्यातील शेती पाण्यावर अवलंबून आहे आणि नेमका हाच प्रश्न आपण सोडवण्यासाठी प्रयत्न करत आहोत. सत्ता असतांना अनेक गावांमध्ये साठवण तलाव, बंधारे, विहीरी अशी कामे करून त्या भागात शेतकऱ्यांसाठी महत्वाचे कामे केले आहेत. मराठवाड्याचा पाणी प्रश्न सुटला पाहिजे. सोलापुर-धुळे हा मार्ग असो, न्यायालयाची बिल्डींग असो, एस.पी.ऑफीसची बिल्डींग, वीज वितरण विभागामार्फत अनेक गावात सबस्टेशन अशी विविध विकास कामे आज पूर्ण झालेली दिसतील. याचा लाभ ग्रामीण भागातील नागरीकांना झाला याचे समाधान आहे. जुमले आणि जुगाडावर आजचे राजकारण सुरू आहे. नुसता धुरळा सुरू आहे. त्यामुळे फक्त फुफाटा दिसु लागला आहे. आता निर्णायक वेळ आली आहे. सर्वांनी बरोबर राहण्याचा संकल्प करूया. आगामी काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका पुर्ण ताकदीने लढायच्या आहेत. दुरद्दष्टीकोन ठेवूनच आता सर्वजण एक व्हा. आपलं ध्येय लक्षात घ्या. भावनेच्या आहारी जावू नका. पुढच्या प्रवासात खंबीरपणे पाठीशी उभे रहा. राजकारणात आणखी कोणती खिचडी होईल हे सांगता येत नाही. त्यामुळे आपण सेवाभाव ठेवून काम करूया. प्रत्येक कार्यकर्त्याच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे राहु असा विश्वास देत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांना बळ दिले. यावेळी राजू कांबळे, शेख इकबाल यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह माजी मंत्री क्षीरसागर गटात प्रवेश केला. सकाळी 11 वाजता आयोजीत करण्यात आलेल्या मेळाव्यात संपूर्ण सभागृह आणि सभागृहाच्या बाहेरचा परिसर खचा-खचा भरला होता. अत्यंत जल्लोष आणि उत्साहात आलेल्या कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्याला आत्मविश्वास देवून समर्थ साथ देण्याचे अभिवचन दिले. यावेळी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या स्वागताने प्रारंभ

**प्रतिनिधी/बिडकीन**

.. बिडकीन-किलबिल प्राथमिक शाळेची उन्हाळ्याच्या प्रदीर्घ सुटीनंतर शनिवारी शाळेची पहिली घंटा वाजली. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नवा डबा, नवे दप्तर, वह्या पुस्तकांची नवलाई असतांना आपल्या मित्र-मंडळींना भेटण्याची उत्सुकता होती. तर दुसरीकडे पूर्व प्राथमिक गटातील चिमुरड्यांनी पहिल्यांदाच पालकांसोबत शाळेत पहिले पाऊल टाकले. नव्याची नवलाई असली तरी सारेच काही अनोळखी असल्याने त्यांच्याकडून आई-वडिलांना काही सोडवत नव्हते. शाळेचा पहिला दिवस




अविस्मरणीय करण्याच्या दृष्टीने शाळेनी जय्यत तयारी केली होती.शाळेनी परिसरात सुटी संपण्याआधीच स्वच्छता अभियान राबवत वर्ग, परिसर चकाचक करण्यात आले. विद्यार्थ्यांचे स्वागत नक्षीदार रांगोळी, गुलाब पुष्पगुच्छ आणि औक्षणाने करण्यात आले. नवीन शैक्षणिक वर्षात शाळेचा प्रारंभ हा चैतन्यमय आणि उत्साहवर्धक झाल्यास शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक वाटचालीसाठी गती मिळते.

या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे मोठ्या सुट्टीनंतर शाळेत येणाऱ्या मुलांचे स्वागत करणे हा तर आहेच, पण याचबरोबर शाळा आणि अभ्यास याबाबत कोणतेही दडपण न वाटता हसत खेळत अभ्यास करावा. आजचा हा शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम खरे तर विद्यार्थ्यांमधली शाळा याविषयीची भीती घालविणारा होता आणि मुळातच शाळेविषयी आपुलकी, अभ्यासाविषयी आवड, मित्र मैत्रिणीमध्ये आपुलकीचे नाते निर्माण करणारा होता असेच म्हणावे लागेल. याप्रसंगी शाळेचे मुख्यध्यापक ,सर्व शिक्षकवृंद ,पालक ,विद्यार्थी उपस्थित होते.

# वायकरांच्या नातेवाईकांनी केला ईव्हीएम अनलॉक करणाऱ्या फोनचा वापर.



नाशिक/सुरेश इंगळे आता उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघातील निकालाला नवे वळण मिळाले असून वायकर यांच्या नातेवाईकासह दोन जनाविरुद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत .शिवसेना (उबाठा) उमेदवार अमोल कीर्तीकर यांनी मतमोजणी बद्दल आक्षेप घेत निवडणूक आयोग आणि न्यायालयात धाव घेतली आहे. या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले असून मुंबई पोलिसांनी नवनिर्वाचित खासदार रवींद्र वायकर यांच्या नातेवाईकासह दोन जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. वायकर यांच्या नातेवाईकांनी ईव्हीएम अनलॉक करणाऱ्या फोनचा सर्रास वापर केल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी एफ आय आर नोंदविला असून या प्रकरणात आता वनराई पोलिसांनी वायकर यांचा नातेवाईक मंगेश पंडिलकर आणि निवडणूक आयोगाचा एन कोर ऑपरेटर दिनेश गुरव यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस तपासात पंडिलकर ईव्हीएमसी जोडलेला मोबाईल वापरत असल्याचे आढळून आले आहे. पोलिसांनी इतर उमेदवाराचे जबाब नोंदविले असून लवकरच या संदर्भात अटकवारंट काढण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. पंडिलकर हा नेमका कोणाच्या संपर्कात होत आहे अहवालानंतर स्पष्ट होईल एन्ट्री पॉईंद्व स्ट्राँग रूम आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणाचे सीसीटीव्ही फुटेज निवडणूक आयोगाकडे मागितले आहे ते मिळाल्यानंतर तपासाला गती मिळेल पंडिलकर आणि गुरव यांना चौकशीसाठी बोलवून गरज पडल्यास अटक वॉरंट जारी करू असेही पोलिसांनी यावेळी सांगितले.

# फर्दापूर पोलीस स्टेशनची उत्कृष्ट कामगिरी २४ तासाच्या आत आरोपीचे जेरबंद ..गिरडाघाट लुटमारीतील सहा आरोपी अटक..

**प्रतिनिधी/सोयगाव**

सोयगांव हद्दीतील गिरडा घाटात मारहाण करून पसार झालेल्या चोरटयांना फरदापूर पोलिसांनी चौवीस तासाच्या आत अटक प्राप्त माहितीनुसार पंजाब थिगळे, धीरज शातम आणि संघानंद इंगळे हे धनिक मायक्रोफायनान्स चे कर्मचारी टिटवी येथून काही जणांकडून कर्ज वसूल करून तिघेजण गिरडा घाट चढून वर जात होते. त्याचवेळी घाटातील महादेव मंदिराजवळ दबा धरून बसलेल्या ५ ते ६ जणांनी तिघांवर एकाकाकी हल्ला चढवला. हल्लेखोरांजवळ लोखंडी रॉड होते. या हल्ल्यात धीरज शांतम गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर बुलडाण्यात येथे उपचार सुरू आहेत. या आरोपी कडे लुटमारीतील दोन लाख १ हजाराचा मुद्दे माल होता त्यापैकी एक लाख दहा हजार रुपये गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल ताब्यात घेण्यात आलेली आहे आरोपी भरत बन्सी चव्हाण वय ३४ राहणार देव्हारी ,शुभम बाळू सुरडकर वय २१ रा टिटवी, संजय प्रभाकर कांडेलकर वय २२, किरण अरुण सपकाळ वय २५,अक्षय उर्फ अमोल प्रकाश जाधव वय २९, मुकेश संजय पवार वय२५ सर्व राहणार गोतमारा तालुका मोताळा जिल्हा बुलढाणा येथील रहिवासी असून फरदापुर पोलिसांनी १२ तासाच्या आत लुटमार करणाऱ्या सहाही आरोपींना अटक करण्यात आली आहे यांच्यावर भादवि कलम 394 ,34, 395 गुन्हा नोंदवून आरोपींना शिताफिने ताब्यात घेतले अटकपूर्व आरोपांची आरोग्य तपासणीसाठी शासकीय रुग्णालय येथे तपासणी केली पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश कुमार कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली फरदापुर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे हे करत आहे आरोपींना अटक करण्यासाठी चोरट्यांचा शोध मोहीमेत पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव चाटे सावळदबारा पोलीस चौकीचे बीट जमादार मिरखा तडवी पोलीस अंमलदार आनंद पगारे, भरत कोळी, योगेश खडके, प्रदीप बेदरकर फरदापुर पोलीसांनी केलेल्या या कामगिरीचे सर्व परिसरात कौतुक केले जात आहे

# ‘गिरे तो भी टांग उपर, घरी बसणाऱ्यांना लोक...’, मुख्यमंत्र्यांचा खोचक शब्दांत निशाणा

विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघाचे उमेदवार निरंजन डावखरे यांच्या प्रचाराच्या निमित्ताने महायुतीचा ठाण्यात आज विजय संकल्प मेळावा पार पडला. या मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर नाव न घेता खोचक शब्दांत निशाणा साधला. “चंद्राबाबू नायडूंनी तुमचा पाठिंबा मागितला का? बेगाने शादी मे अब्दुल्ला दिवाना. सरकार पडणार, मुख्यमंत्री



बदलणार, असं म्हणतात. गिरे तो भी टांग उपर है. घरी बसणाऱ्यांना लोक निवडून देणार नाही”, असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला. “तरीही आपण बिलकुल गाफील राहू नका. 400 पार बाबत लोक रिलॅक्स झाले होते. मोदी सबको भारी पडले आहेत. तडीपार करणार, अशा घोषणा देणाऱ्यांनो, तुम्हाला महाराष्ट्राच्या जनतेने तडीपार केले आहे. तुम्ही आम्हला काय तडीपार करणार?”, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी केली.

# मागासवर्गीय तसेच शेतकऱ्यांचे कर्ज राज्य सरकारने माफ करावे. - रानबा गायकवाड

**परळी/प्रतिनिधी**

राज्य शासनाने महाराष्ट्रातील मागासवर्गीयांची तसेच शेतकऱ्यांची सर्व प्रकारचे कर्ज माफ करावीत असे आवाहन प्रसिद्ध साहित्यिक व ज्येष्ठ पत्रकार रानबा गायकवाड यांनी केले आहे. या कर्जमाफीमुळे आर्थिक संकटात सापडलेले मागासवर्गीय आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

याबाबत प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात पुढे रानबा गायकवाड यांनी म्हटले आहे की, केंद्र सरकारने मागील दहा वर्षाच्या काळात मोठ्या उद्योगपतींचे सुमारे १५ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले आहे. अनेक मोठमोठ्या उद्योगपतींनी शासनाचे हजारो कोटी रुपयांचे विविध बँकांचे कर्ज काढून बँकांना व सरकारला फसवले आहे. तर अनेक जण देशात पळून गेले आहेत. सरकारचा मोठे उद्योगपती तसेच सर्वसामान्य कर्जदारांसाठी वेगळा न्याय कशासाठी?



2020 पासून देशात कोरोना आला तेव्हापासून देशातील अनेकांचे उद्योग धंदे बंद पडले आहेत. अनेकांच्या नौक-या गेल्या आहेत. नवीन रोजगाराच्या संधी पूर्णपणे बंद झाले आहेत. केंद्र आणि राज्य सरकारने सरकारी नोकर भरती बंद करून कंत्राटीकरणावर जोर दिला आहे. यामुळे शिक्षण घेऊन सुद्धा सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी लागेलच याची शाश्वती राहिली नाही. मागासवर्गीय समाजातील सर्वसामान्य लोकांनी काढलेले विविध बँकांचे कर्ज फेडणे आज अवघड झाले आहे. आर्थिक व्यवहार संकटात सापडलेले आहेत. तशीच परिस्थिती कोरडवाहू व अल्पभूधारक शेतकऱ्यांची सुध्दा झालेली आहे.शेतात पिकविलेल्या शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने कवडीमोल भावाने शेतमालाची विक्री करावी लागते आहे.केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या मालाला योग्य हमीभाव देत नसल्यामुळे शेतकरीही आर्थिक संकटात आहे. त्यामुळे अनेक शेतकरी आज मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत.

मागासवर्गीय समाजाची आणि शेतकऱ्यांची निर्माण झालेली बिकट आर्थिक परिस्थिती लक्षात घेता राज्य सरकारने महाराष्ट्रातील मागासवर्गीय समाजातील सर्वांचे तसेच राज्यातील सर्व अल्पभूधारक व कोरडवाहू शेतकऱ्यांचे सर्व प्रकारचे कर्ज माफ करावीत अन्यथा तीव्र आंदोलन उभा करण्यात येईल असा इशाराही रानबा गायकवाड यांनी दिला आहे.

# सुसंस्कृत समाज घडविण्याची जबाबदारी पालकांचीच-सौ. भगवतीदेवी बलदवा
# परळी तालुका माहेश्वरी सभेच्या वतीने महेश नवमी उत्साहात साजरी

**परळी/प्रतिनिधी**

१५ जून रोजी माहेश्वरी समाजाचा उत्पत्ती दिवस अर्थात महेश नवमी निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात “कौटुंबिक समरसता” या विषयावर मार्गदर्शन करताना बलदवा यांनी वरील मनोगत व्यक्त केले.

परळी येथील परळी तालुका माहेश्वरी सभेच्या वतीने आयोजित श्री महेश नवमी निमित्त सकाळी ८:०० वाजता हनुमान मंदिर मोंढा मार्केट येथून शोभा यात्रेची सुरुवात झाली. टावर, गणेश पार, आंबेवेस मार्गे बालाजी मंदिरा पर्यंत शोभायात्रा काढण्यात आली. शोभा यात्रेमध्ये समाजातील महिला व पुरुष पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. बालाजी मंदिरामध्ये श्री हनुमानदासजी तोष्णीवाल यांच्या हस्ते सपत्नीक श्री महेश भगवान चे पूजन करण्यात आले. आरती व प्रसादा नंतर शोभा यात्रेची सांगता झाली.

परळी तालुका माहेश्वरी सभेच्या वतीने राजस्थानी सार्वजनिक स्मशानभूमी व अरुणोदय मार्केट येथील माहेश्वरी सेवा ट्रस्टच्या जागेमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. सदरील वृक्षारोपण करण्याचे आवाहन अखिल भारतीय माहेश्वरी महासभेच्या वतीने करण्यात आले होते.




सायंकाळी पाच वाजता अक्षता मंगल कार्यालय येथे विविध गुणवंतांचा सत्कार समारंभाच्या वेळी सौ. भगवतीदेवी बलदवा यांनी “कौटुंबिक समरसता” या विषयावर मार्गदर्शन केले.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की आपल्या पाल्यावर संस्कार घडवण्याचे काम आई-वडिलांनीच केले पाहिजे. लहानपणापासून त्यांना जर संस्काराची, संस्कृतीची रुजवून झाली तरच भविष्यात सुसंस्कृत नागरिक निश्चितच घडेल, यात शंका नाही.

आपला पाल्य वाईट व्यसनाकडे झुकत असेल तर त्याला वेळीच पाय बंद घालायला पाहिजे. नसता पश्चात्ताप करण्याची वेळ येते. ॅदरम्यान या कार्यक्रमाची सुरुवात श्री महेश वंदना स्तुती करत झाली. या कार्यक्रमास समाजातील बहुसंख्य महिला आणि पुरुष उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अखिल भारतीय माहेश्वरी महासभा चे संयुक्त मंत्री श्री जुगलकिशोर लोहिया तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र माहेश्वरी सभा चे संयुक्त मंत्री नंदकिशोर तोतला, परळी तालुका माहेश्वरी सभेचे अध्यक्ष जयपाल लाहोटी आणि बीड जिल्हा माहेश्वरी महिला संगठन च्या सचिव सौ.रश्मी नावंदर आदी मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष जयपाल लाहोटी यांनी केले तर आभार प्रदर्शन सचिव विनोद लड्डा यांनी केले.

# सोयगाव तालुक्यात बकरी ईद शांततेत साजरी करावी पोलीस उपविभागीय अधिकारी दिनेश कुमार कोल्हे व सपोनी प्रफल्ल साबळे यांचे आवाहन

**प्रतिनिधी/सोयगाव**

दिनांक १७ जून रोजी बकरी ईद साजरी होणार आहे. ईद शांततेत साजरी करावी, यानिमित्त १४/०६/२०२४ रोजी फरदापुर पोलीस स्टेशन अंतर्गत गावातील नागरीकांनी सहकार्य करावे, अनुचित प्रकार घडल्यास पोलिसांना माहिती द्यावी. सोशल मीडियावर अफवा पसरवून शांतताभंग करणाऱ्यांची माहिती फरदापुर पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलीस उपविभागीय अधिकारी



दिनेश कुमार कोल्हे यांनी केले आहे. यावेळी फरदापुर शहरातील मुस्लिम समाजाचे धर्मगुरू, प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. फरदापुर पोलीस स्टेशनमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे व पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव चाटे यांच्यामार्फत ईद सना निमित्त बैठक घेण्यात आली. यावेळी उपस्थितांनी सांगितले की, ईदनिमित्त विद्युत खंडीत होणार नाही, पुरेशा प्रमाणात पाण्याची व्यवस्था करावी, वाहतूकीचे नियोजन करण्यात यावे. कुर्बानीनंतर साफसफाई करावी आदी सूचना केल्या. सिल्लोड पोलीस उपविभागीय अधिकारी दिनेश कुमार कोल्हे यांनी मुस्लिम बांधवांना ईदची शुभेच्छा दिल्या

# जागतिक योग दिनानिमित्त अंमळनेर येथे योग शिबिराचे आयोजन



पिंपळवंडी/पतिनिधी जागतिक योग दिनानिमित्त आर्ट ऑफ लिविंग यांच्या वतीने कला,विज्ञान,वाणिज्य महाविद्यालय अंमळनेर (भां) ता.पाटोदा जि.बीड येथे दि. १७/०६/२०२४ ते दि. २२/०६/२०२४ पर्यंत सकाळी ०६ ते ०९ या वेळेत सहा दिवसाचे योग शिबिर आनंद अनुभूती शिबिर आयोजित केले आहे.तरी पंचक्रोशीतील सर्वांनी या योग शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.सुरेश गर्जे, रविंद्र कदम,धर्मराज शिंदे,प्रा. बंडू शेरकर यांनी केले आहे.या शिबिरात आनंदी जीवन जगण्याची कला,योग,प्राणायाम,ध्यान व अतिशय सुंदर अशी सुदर्शन क्रिया शिकवली जाते.या शिबिरात १८ ते ५५ वर्ष वयोगटातील लोक सहभागी होऊ शकतात.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

सोमवार १७ जून २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# छत्रपती संभाजीनगर येथे मेडिकलच्या विद्यार्थिनीचा टवाळखुराने भर रस्त्यात धरला हात

## घाटीतील धक्कादायक घटनेने सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह..

**छ. संभाजीनगर/प्रतिनिधी** दोन दिवसपूर्वीच रॅगिंग च्या घटनेमुळे चर्चेत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) आता एका मेडिकलच्या विद्यार्थिनीची भर रस्त्यात टवाळखोराने छेड काढण्याचा प्रकार समोर आला आहे या घटनेमुळे खळबळ उडाली असून घाटीतील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्न निर्माण झाले आहे दरम्यान या घटनेमुळे धाबे दणाणलेल्या घाटी प्रशासनाने आता सुरक्षा व्यवस्था वाढवली असून वस्तीग्रहाच्या प्रवेशद्वारावर सुरक्षारक्षक तैनात केले आहेत

नक्की काय झाले?

गाठी रुग्णालयात जुनियर विद्यार्थ्यांची रॅगिंग झाल्याचा धक्कादायक प्रकार गुरुवारी समोर आल्यानंतर दुसऱ्याच दिवशी शुक्रवार १४ जून टवाळखोरांनी दंत महाविद्यालयाच्या एका



विद्यार्थिनीची छेड काढण्याची घटना घडली या घटनेमुळे ती विद्यार्थिनी भयभीत झाली असून सध्या ती वस्तीग्रहावर सुरक्षित आहे घाटी परिसरात शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय विद्यार्थी - विद्यार्थिनींचे होस्टेल आहे, शुक्रवारी सायंकाळी वस्तीगृहातून

पदवी पूर्व अभ्यासक्रमाच्या चौघी विद्यार्थिनी तब्येत ठीक नसल्याने सर्दी खोकल्याची औषधे आणण्यासाठी बाहेर पडल्या होत्या त्या अधिष्ठाता बंगल्यासमोरून जात असताना मागून आलेल्या टवाळ खुराणे एका विद्यार्थिनीचा हात पकडून शेड काढली अचानक घडलेल्या या प्रकाराने चौघी विद्यार्थिनी घाबरून गेल्या त्यांनी तिथून पळ काढत परत वस्तीग्रह गाठले दुसऱ्या दिवसापासून विद्यार्थिनींची परीक्षा असल्याने आधीच त्या तणावत होत्या त्यात अशी घटना घडल्याने त्या धास्तावल्या या घटनेबाबत दंत रुग्णालयाच्या अधिष्ठाता

### प्रशासन अलर्ट मोडवर...

रॅगिंग पाठव पार्ट शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयाच्या विद्यार्थिनीची छेड काढण्याची घटना घडल्यानंतर घाटी परिसरातील सुरक्षा वाढवण्यात आले आहे, वैद्यकीय आणि डेंटल च्या विद्यार्थ्यांचे वस्तीग्रह एकाच परिसरात आहे ये जा करण्यासाठी एकच प्रवेशद्वार आहे या प्रवेशद्वारावर सुरक्षारक्षक तैनात केले असून ओळखपत्र तपासूनच प्रवेश दिला जात आहे त्याचबरोबर एम बी बी एस च्या वस्तीगृहातील २७ पैकी ५, सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत, हे कॅमेरे दुरुस्त करण्यासह नवीन १३ कॅमेरे येथे बसवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, डेंटल च्या वस्ती गृहातून रात्री ९:३० वाजेनंतर विद्यार्थ्यांना बाहेर जाता येणार नाही, कॉल वर जाताना मुली सोबत सुरक्षारक्षक दिले जाणार आहेत, अशी माहिती डॉक्टर माया इंदुलकर यांनी दिली

डॉ माया इंदुरकर यांनी सांगितले की घडलेल्या घटनेमुळे विद्यार्थिनी भयभीत झाले आहेत त्यांचे समुपदेशन गरजेचे आहे तक्रार देण्यासंदर्भात पालक शिक्षकांशी चर्चा करून ठरविले जाईल

---

# रेवली गावात एचआयव्ही/एड्स जनजागृती व तपासणी शिबिर संपन्न!

## आयसीटीसी विभाग उपजिल्हा रुग्णालय परळी वै. व लिंक वर्कर प्रकल्प यांच्या संयुक्त उपक्रम

**परळी/प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील मौजे रेवली येथे एचआयव्ही एड्स जनजागृती तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सुमारे ७३ ग्रामस्थांनी तपासणी केली. सदरील शिबिर हे आयसीटीसी विभाग उपजिल्हा रुग्णालय परळी व लिंक वर्कर प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. सदरील शिबिरास रेवली ग्रामस्थांनी चांगला प्रतिसाद दिला.

दि.१३ जून २०२४ रोजी जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंधक कक्ष जिल्हा रुग्णालय बीड व वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय परळी यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आयसीटीसी विभाग उपजिल्हा रुग्णालय परळी वै. व लिंक वर्कर प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमानाने



ग्रामपंचायत रेवली या गावात एच आय व्ही जनजागृती व तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात प्रथम समुपदेशक श्री शरद चव्हाण यांनी सरपंच, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व गावकरी यांना एच आय व्ही /एड्स ,टीबी गुप्तरोग या आजारांची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर आईसी वाटप करण्यात आली व नंतर प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री अमोल गालफाडे यांनी गावकऱ्यांची रक्त तपासणी केली.

या शिबिरात एकूण ७३ गावकऱ्यांची एच आय व्ही तपासणी करण्यात आली. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी लिंक वर्कर प्रकल्पाच्या पियर लता आघाव, शाहीन मॅडम व गावच्या सरपंच रेखा मनोहर केदार, माजी सरपंच मनोहर बाबुराव केदार, आशा वर्कर मनीषा दळवे, संगीता तरकसे यांनी अथक परिश्रम घेतले.



कलामहर्षी चित्रसूर्य कै. बाबुराव पेंटर पुरस्कार सोहळा २०२४, चित्रपट निर्मिती व्यवस्थापन विभागासाठी श्री. कुणाल निंबाळकर यांना यशस्वी कार्यासाठी कलामहर्षी कै. बाबुराव पेंटर स्मरणार्थ सन्मान २०२४ जगविख्यात लावणी सम्राज्ञिनी श्रीमती. सुरेखा ताई पुणेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सत्यआरंभ सिने नाट्य संस्था, पुणे आणि डीलक्स स्टुडिओज च्या वतीने दैदिप्यामान पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृह, सातारा रोड येथे सोहळा संपन्न झाला.

---

# पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचे काम जनहितार्थ याचिकेमुळे पूर्ण होण्याची आशा- एडवोकेट नरसिंह जाधव

**पाटोदा/प्रतिनिधी**

. पैठण पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचे काम हे गेल्या दोन-तीन वर्षापासून रखडले असून हे कामे होत नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता या संदर्भात अनेक वेळा निवेदने देऊन आंदोलने केली मात्र कसल्याही प्रकारचा फरक पडला नाही त्यामुळे शेवटी यासंदर्भात जनहित याचिका औरंगाबाद हायकोर्टात जनहित या चुका एडवोकेट लक्ष्मण नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्या हस्ते दाखल केल्याने आता कुठे अधिकाऱ्याला जाग आली असून शनिवारी संबंधित हायवेची अधिकारी आमदार बाळासाहेब आजबे तसेच याचिका करताचे एडवोकेट नरसिंह जाधव तसेच कॉं महादेव नागरगोजे आदीनीई संयुक्तरित्या पाहणी केली संबंधित अधिकाऱ्यांनी काम लवकरात लवकर करू असे आश्वासन दिले त्यामुळे आता रस्त्याचे काम मार्गस्थ लागणार असे चित्र दिसत आहे

पैठण पंढरपूर राज्य मार्ग हा मुंगी बोधेगाव, घोणस पारगाव, उखंडा, चकला, मिडसांगवी, शिरूर कासार, राक्षसभुवन खोल्याचीवाडी, कारेगाव, डोंगरकिन्ही, चुंबळी, पाटोदा, पारगाव घुमरा, दिघोळ हा राष्ट्रीय महामार्ग 2017 मध्ये मंजूर होऊन सदरील कामाची निविदा निघून ते काम संबंधित गुत्तेदार यांना देण्यात आली होते. परंतु सदरील काम तुकड्या तुकड्यां मध्ये 70 ते 75 टक्के संबंधित ठेकेदार यांनी केले अनेक ठिकाणी सदरील रोडला भेगा पडलेल्या असून निकृष्ट दर्जाची काम झाले आहे तसेच सदरील रोडच्या बाजूने कुठलेही झाडे लावलेली नाहीत अनेक ठिकाणी रोडची काम अपुरी ठेवल्यामुळे मोठमोठे खड्डे तयार होऊन वाहनधारकांना त्यापासून अतोनात त्रास होत आहे अनेक ठिकाणी पुलाची कामे देखील झाली नाहीत पारगाव, पाटोदा, चुंबळी मढेकर वस्ती वरील घाट, कारेगाव या ठिकाणी रस्त्याची अत्यंत वाईट परिस्थिती आहे त्यामुळें वाहनांची अपघात होऊन माणसे दगावले आहेत वाहनांची नुकसान झालेले आहे सदरील पालखी मार्ग पैठण ते पंढरपूरला जाणारा वारकरी व पालख्याना अत्यंत जवळचा असून सात वर्षापासून सदरील रोडचे काम रखडले आहे संबंधित गावातील नागरिकांनी वारंवार निवेदने दिली मोर्चे काढले परंतु पोकळ आश्वासन शिवाय हाती काहीच पडले नाही म्हणून चुंबळी गावचे रहिवासी कॉमेड महादेव नागरगोजे, पाटोदा येथील रामकृष्ण रंधवे महाराज व शेतकरी चक्रपाणि लक्ष्मणराव जाधव यांनी शेवटी माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठांमध्ये जनहितार्थ याचिका क्रमांक 22/2023 ॲड. नरसिंह लक्ष्मनराव जाधव यांच्यामार्फतपैठण पंढरपूर रस्त्याचे काम मार्ग असताना माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठांमध्ये जनहितार्थ याचिका क्रमांक 22/2023 ॲड. नरसिंह लक्ष्मनराव जाधव यांच्यामार्फत दाखल करून सदरील रस्त्याचे काम लवकरात लवकर या करावे तसेच ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्यांना मावेजा द्यावा अशी विनंती माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठांमध्ये केली आहे सदरील याचीके मध्ये दिनांक 4/5/२०२४ रोजी प्रतिवादी १. केंद्र सरकार राष्ट्रीय महामार्ग मंत्रालय २. सचिव रेल्वे मंत्रालय ३. महाराष्ट्र शासन ४. वन विभाग या सर्वांना मान्य उच्च न्यायालयाने नोटीसा काढल्या होत्या. सदरील याचिकेची सुनावणी २ जुलै 2024 रोजी ठेवली असून तत्पूर्वी सदरील पैठण पंढरपूर महामार्गावरील गावातील लोकांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या समस्या जाणून घेऊन सदरील रस्ता लवकरात लवकर पूर्ण करण्यात हवा यासाठी कॉम्रेड महादेव नागरगोजे, ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी अनपटवाडी पारगाव घुमरा, नफरवरली, पाटोदा, चुंबळी, मळेकर वस्ती, डोंगर किनी, कारेगाव खोल्याचीवाडी, राक्षसभुवन, शिरूर कासार या गावांचा दौरा केला असता सदरील गावातील नागरिकांनी वरील मागणीसाठी लेखी पाठिंबा दिला व त्यांच दरम्यान राष्ट्रीय महामार्गाची प्राधिकरण कार्यकारी अभियंता व इतर संबंधित अधिकारी संबंधित गावभागातील लोकप्रतिनिधी बाळासाहेब आजबे यांनी वरील गावांचा दौरा करून सदरील अपूर्ण कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल अशी आश्वासन नागरिकांना 1/6/24 रोजी दिले परंतु पावसाळ्याच्या तोंडी डोंगर किनीच्या घाटामध्ये वाहने चालवणे अत्यंत कठीण झालेली आहे ते काम प्रशासन दोन दिवसात खरंच सुरू करते आहे काय? किंवा पुढे सुनावणी २ जुलै 20२४ रोजी ठेवलेली असून माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशाची वाट बघावी लागेल काय याबाबत संपूर्ण शिरूर व पाटोदा तालुक्यातील लक्ष लागलेले आहे सदरील राष्ट्रीय पालखी महामार्गाचे काम आष्टी मतदार संघातील दोन आमदार असून देखील सात वर्षापासून रखडलेले असल्यामुळे शिरूर व पाटोदा येथील जनता विधानसभेच्या निवडणुकीमध्ये याचा जाब लोकप्रतिनिधींना विचारल्याशिवाय राहणार नाही

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com